# पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २०.०२.२०१७<br>०२.०० |
| --- | --- | --- |

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :–औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २०.०२.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे शिल्लेगावः–** गुरन । ४७/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे अजय अशोक ठेगने वय २४ वर्ष व्यवसाय सहायक अभियंता महावितरण लासुर स्टेशन ता. गंगापुर यांनी फिर्याद दिली की दिनांक १८.०२.२०१७ रोजी ०७.००वा. दरम्यान हर्सुल भानवाडी शिवारात शेत गट नं. ६८/७०/७१ मधिल शेतातील एकुण ८ पोल वरील ४२०० फुट लांबीची जुनी वापराची ॲल्युमिनियम ची तार एकुण २००००/–रू.किं. कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीचे इरादयाने चोरून नेली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/५७१ गंगावणे पोस्टे शिल्लेगाव हे करीत आहे.

**०२) पोस्टे विरगावः–** गुरन । ४३/१७ कलम ४३० भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे राजन सोविंद खापर्डे वय ४९ वर्ष व्यवसाय नौकरी शाखा अभियंता नांदुर मदनेश्वर पाटबंधारे विभाग वैजापुर यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) सुभाष उत्तम निगळ २) सचिन मनसुख निगळ ३) रामनाथ पंढरीनाथ निगळ व ईतर ०२ ते ०३ अनोळखी ईसम सर्व रा. कापुसवाडगाव ता.वैजापुर यांनी संगनमत करून कालव्याच्या नळकांडी पुलाला अवैद्यरित्या भगदाड पाडुन पाण्याचा प्रवाह अनाधिकृत बदलुन नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सफौ जरारे पोस्टे विरगाव हे करीत आहे.

**०३) पोस्टे पैठणः—** गुरन I ७०/१७ कलम ४२० भादवि सहकलम ६६(क) माहीती तंत्रज्ञान अधिनियम २००० नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे दगरू भिमराव कदम वय ३९ वर्ष व्यवसाय शेती रा. चानकवाडी ता.पैठण यांनी फिर्याद दिली की यातील मोबाईल क्रं. ८८७७६५४६८६ चा धारक नाव गाव माहीत नाही याने फिर्यादीचा मोबाईल क्रमांकावर तो महाराष्ट्र बॅंकेचा मॅनेजर बोलतो असे सांगुन त्याचा विश्वास संपादन करून फिर्यादीचा बॅंक एटीएम ची माहीती विचारून त्याचे खात्यावरून परस्पर २९९९७/—रू. काढुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. गिरी पोनि पोस्टे पैठण करीत आहे.

**आकस्मात मृत्युः—**

**०१) पोस्टे पैठणः—** आ.मृ. नंबर ०७/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पोह/२९९ आर.आर. गायके नेमणुक घाटी रूग्णालय चौकी औरंगाबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे भाउसाहेब जगन्नाथ मगरे वय ५५ वर्ष रा. चनकवाडी ता. पैठण ह.मु. नविन कावसान पैठण याने स्वत:चे राहत्या घरी काहीतरीविषारी औषध सेवन केल्याने त्यास उपचार कामी घाटी दवाखाना औरंगाबाद येथे दाखल केले असता उपचार दरम्यान त्याचा मृत्यु झाला वगैरे एमएलसी वरून आ. मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/११७७ बर्डे पोस्टे पैठण हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०२ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०२ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन २७००/—रू. किं. १८० मिलीच्या ५४ देशी दारूच्या बाटल्या चा माल जप्त करण्यात आला आहे.

**जुगार प्रतिबंधक कायदा:—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टेला ०३ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०६ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन २८२०/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य चा माल जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

**श्री सफौ पुरी नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**